REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
(टपाल हंशिल माफ)
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ४ | पुणें, बुधवार, तारीख २५ मे, १९३८ | अंक २१

FOR
SAFETY, ECONOMY
AND
DURABILITY
Consult
V. G. & Sons
ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.



टिळक आयर्न अँड स्टील वर्क्स
[सर्व प्रकारचें स्टील स्ट्रक्चरल वर्क (काम) तयार करतात.]
मो. मु. टिळक
प्रो. मेकॅनिकल इंजीनिअर.

अलम दुनियेंत गोड आवाजीमुळें महशूर झालेल्या
कोकीळकंठी गानदेवता
र त्न प्र भा
यांचें अत्यंत कर्णमधुर
" हांसत ये हळूं डोलत ये "
हें गोड गाणें ग्रामोफोन रेकॉर्डमुळें सर्वांच्या तोंडीं झालेंच आहे
तें प्रत्यक्ष ऐकतांना तुमचें देहभान हरपेल !

ज्वाला
शनिवार ता. २८ पासून सुरू
तनुला जाळी आग भडकली
राक्षसी महत्त्वाकांक्षी मदांधाचा अधःपात
दिग्दर्शक—मा. विनायक, कथालेखक—वि. स. खांडेकर
मिनर्व्हा--पुणें

भूमिकाः—रत्नप्रभा, चंद्रमोहन

विविध माहिती

इंपीरिअल बँकेंत हिंदी अधिकारी

इंपीरिअल बँकेनें गेल्या १० वर्षांत नेमलेल्या अधिकाऱ्यांमध्यें १४ हिंदी गृहस्थ असून १४ युरोपियन आहेत.

सेवानिवृत्त सनदी नोकराची नेमणूक

बाँबे फायर इन्शुअरन्स असोसिएशन, बाँबे ॲक्सिडेंट इन्शुअरन्स असोसिएशन आणि बाँबे अंडररायटर्स असोसिएशन, ह्या तीन संस्थांचे अध्यक्ष म्हणून सर रॉबर्ट बेल ह्यांची नेमणूक झाली असून ते आक्टोबर १९३८ मध्यें कामावर रुजूं होतील, असें जाहीर झालें आहे.

काटकसरी पोप

कॅथॉलिक धर्मगुरू, अकरावे पायस, हे अत्यंत काटकसरी आहेत. ते पीठावर आले, तेव्हां त्यांच्या तिजोरींत फारच थोडी शिल्लक होती. स्पेनमधील दुःस्थितीचें निवारण करण्याकरितां ते सढळ हातानें पैशाचें सहाय देत आहेत.

तज्ज्ञांची सल्लागार कमिटी

उद्योगधंद्यांची वाढ, शेती सुधारणा, व्यापार वृद्धि, इत्यादि बाबतींत योजना आखून काँग्रेसपक्षीय प्रांतिक मंत्रिमंडळांस सल्ला देण्याकरितां उद्योगधंद्यांतील पुढारी व अनुभवी अर्थशास्त्रज्ञ ह्यांची समिति नेमण्याचा काँग्रेसच्या वर्किंग कमिटीचा विचार आहे.

परदेशांतून ग्रेटब्रिटनमध्यें कामगारांचा प्रवाह

गेल्या वर्षी परदेशांतील २१,३१९ कामगारांनीं ग्रेट ब्रिटनमध्यें प्रवेश मिळविला, आणि त्यांतील ७,२०८ ऑस्ट्रियांतून व २,९४२ जर्मनींतून आले. १९२३ सालीं फक्त ८,५८४ लोकच ग्रेटब्रिटनमध्यें नोकरीचे निमित्तानें दाखल झाले होते.

ट्रेझरी बिलांवर १ रु ६ आ. ११ पै व्याज

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत १ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा दर द. सा. द. शे. १ रु.६ आ. ११ पै पडला.

चेक्सची क्लिअरिंग हौसमार्फत उलाढाल

मुंबई येथील बँकर्स क्लिअरिंग हौसमधून १३ मे अखेर संपलेल्या आठवड्यांत १, २१, ४३० चेक्सची देवघेव झाली.

नवीन चलनी नोटा

ब्रह्मदेशाकरितां नवीन स्वतंत्र चलनी नोटा काढण्यांत आल्या असून त्या आतां तेथील व्यवहारांत खेळूंहि लागल्या आहेत.

हिंदुस्थानांत मोटार कारखाना

मोटारींच्या बनावटीस लागणारा कच्चा माल, कुशल कामगार, स्वस्त मजुरी, इत्यादि गोष्टी हिंदुस्थानांत मोटारींचें उत्पादन करण्यास अनुकूल आहेत, असा अभिप्राय फायट मोटार कारखान्याचे प्रतिनिधि, मि. मॅरिअट, ह्यांनीं नुकताच व्यक्त केला.

चहाचा खप

सबंध जगांत मिळून दरसाल १ अब्ज पौंड चहा खपतो. इंग्लंडमध्यें प्रत्येक मनुष्यास सालिना सरासरीनें९पौंड चहा लागतो.

ग्रेटब्रिटन व आयर्लंड ह्यांमधील करार : इंग्लंडचें नुकसान

ग्रेटब्रिटन व आयर्लंड ह्यांमधील नुकत्याच झालेल्या करारानें आयर्लंडमधून ग्रेटब्रिटनमध्यें आयात होणाऱ्या मालावरील जकात कमी केली आहे व त्यामुळें ग्रेट ब्रिटनला सालिना ५½ कोटि रुपये उत्पन्नास मुकावें लागलें आहे.

इलेक्ट्रिकल सुपरवायझर्स व वायरमेन ह्यांच्या परीक्षा

वरील परीक्षांस मुंबई, पुणें व अहमदाबाद येथें एकाच वेळीं ता. २५ जुलै, १९३८ रोजीं ९-३० वाजतां प्रारंभ होईल.

ग्लासगो प्रदर्शनांत दहा हजार मोटारी उभ्या रहाण्याची सोय

ग्लासगो येथील औद्योगिक प्रदर्शनांत प्रेक्षकांच्या दहा हजार मोटार गाड्या एकाच वेळीं उभ्या रहाण्याची सोय करण्यांत आली आहे.

झांझिबारच्या लवंगा आणि हिंदुस्थान

झांझिबारमधून बाहेर जाणाऱ्या लवंगांच्या एकूण किंमतीपैकी ४० टक्के किंमतीचा माल हिंदुस्थानांत येतो. ह्यावरून येथील लवंगाबहिष्काराचें महत्त्व ध्यानांत येईल.

दंडाची मिळकत

ग्रेटब्रिटनमधील कोर्टांनीं सुनावलेल्या दंडाच्या वसुलीची रकम सालिना सुमारें ६५ लक्ष रुपये भरते. त्यांपैकीं ५० लक्ष रुपये मोटारवाल्यांपासून वसूल होतात.

इंजनांचा वेग मोजणारीं यंत्रें

आगगाडीचा वेग अंदाजानेंच नियंत्रित करावा लागतो; इंजन किती वेगानें जात आहे हें कळण्यास दुसरा मार्ग नसतो. ग्रेट ब्रिटनमधील सुमारें २५० इंजनांच्या चाकांस गति मोजणारीं यंत्रें जोडण्यांत आलीं आहेत, त्यामुळें आतां आगगाड्यांचा वक्तशीरपणा वाढण्यास सहाय होईल.

यंत्रसामुग्रीची हिंदुस्थानांत आयात

१ एप्रिल ते ३१ डिसेंबर, १९३७ ह्या नऊमाहींत एकूण ७ कोटि, ७१ लक्ष रुपयांची ब्रिटिश यंत्रसामुग्री हिंदुस्थानांत उतरली. १९३६ च्या तत्सम नऊमाहीसंबंधाचा आकडा ६ कोटि, ८९ लक्ष रुपये इतका होता. जर्मन यंत्रांची आयातहि वाढत आहे.

ब्रिटिश लष्करांत उमेदवारांची भरती

ब्रिटिश लष्करांत सैनिक होऊं इच्छिणाऱ्या उमेदवारांचा तुटवडा पडत असल्याची तक्रार सरकारतर्फे लॉर्डांच्या सभेंत दोन वर्षांमागें करण्यांत आली होती. आतां लष्करी नोकरी आकर्षक करण्याचे हरतऱ्हेचे यत्न चालू असून त्यांचा उमेदवारांच्या भरतीवर इष्ट परिणाम झाला आहे. १९३८ मध्यें ५३ हजार उमेदवार घ्यावयाचे आहेत, त्यांपैकीं चालू वर्षाच्या पहिल्या तिमाहींत १० हजार दाखल झाले आहेत. १९३७ सालांतील भरती ह्यापेक्षा ३ हजारांनीं कमी होती.

भाडघर येथील विजेचा उपयोग

भाडघर येथील धरणांतील पाण्याचे सहायानें वीज तयार करणाऱ्या विद्युत्गृहाच्या विजेचा उपयोग आजूबाजूच्या खेडेगांवांतील लोकांसहि व्हावा, ह्या हेतूनें मुंबई सरकारनें एक योजना आखली आहे. भाडघर ते लोणंद तारा नेऊन खेडेगांवांस वाटेंत वीज पुरवण्याच्या योजनेस ८५ हजार रुपये खर्च येईल. भाडघर येथील वीज पुणें येथील गव्हर्नरच्या बंगल्यास, येरवडा तुरुंगास व तेथील वेड्यांच्या इस्पितळास पोचविल्यास, वार्षिक खर्चांत बचत होणार आहे.

मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

	किंमत रुपये
८-५-३८ ते १४-५-३८	२८,१३,१९७
१५-५-३८ ते २१-५-३८	३४,२४,९१९
२१-९-३१ ते २१-५-३८	३,१४,३५,३१,३००

अनुक्रमणिका

	पृष्ठ		पृष्ठ
१ विविध माहिती ...	२४४	रच्या लवंगा आणि हिंदी व्यापार	
२ व्यापारी हुंड्यांची देवघेव कशी वाढेल ? ...	२४५	५ अखिल भारतीय गो-प्रदर्शन, दिल्ली ...	२४९
३ बावडा दप्तर ...	२४६	६ फोर्ट (मुंबई) विभागांतील सहकारी परिषद् ...	२५०
४ स्फुट विचार ...	२४७	७ रत्नागिरी येथील वसंत व्याख्यानमाला ...	२५१
पांच मिनिटांत सलास—नवीन कर्जास प्रचंड मागणी—बाहेरील तज्ज्ञांच्या नेमणुकी केव्हां थांबणार ! हिंद-ब्रिटन व्यापारी कराराची ओढाताण—झांझिबा-		८ कॉमनवेल्थ विमा कं. चा गौरव	२५१
		९ निवडक बाजारभाव	२५४

अर्थ

बुधवार, ता. २५ मे, १९३८

व्यापारी हुंड्यांची देवघेव कशी वाढेल ?

देशाच्या आर्थिक व व्यापारी उलाढालींमध्यें व्यापारी हुंड्यांचें किती महत्त्व आहे, ह्याची चर्चा "अर्था" मध्यें वारंवार येऊन गेली आहे. आज त्या संबंधांतल्या परिस्थितीविषयीं दोन शब्द लिहिण्याचें योजलें आहे. विकलेल्या मालाबद्दल मुदतीची हुंडी खरेदीदाराचे नांवें काढून व ती डिस्कौंट करून घेऊन रकम हातीं आणण्याची व्यापाऱ्यांची पद्धति आहे. ही हुंडी मुदत भरेपर्यंत ते स्वतःजवळ ठेवीत नाहींत. ते ती हुंडी विकून टाकतात व राहिलेल्या मुदतीचें व्याज कापून देऊन कमी किंमत स्वीकारतात. अशा रीतीनें व्यापारी हुंड्या बाजारांत प्रसृत होतात व त्या चलनाचें काम करतात. सरकारी चलनी नोटा व चेक्स ह्यांप्रमाणेंच हुंड्याहि समाजांत पैसा खेळवतात, इतकेंच नव्हे, तर व्यापारी पेठेंतील मोठ्या स्वरूपाच्या देण्याघेण्याचें तें प्रमुख साधन झालें आहे. मालाचे तारणावर काढलेल्या हुंड्या ऐनजिनसी भक्कम पायावर उभारलेल्या असतात व चलनी नोटांइतकेंच त्यांस महत्त्व प्राप्त होतें. एकच हुंडी, तिची मुदत भरेपर्यंत, अनेकांचे हातांतून खेळत रहात असल्यामुळें व्यापारी देवघेवीस सुलभता प्राप्त होते व सुवर्णसंचयावर आधारलेल्या चलनास ताण सोसावा लागत नाहीं. अंतर्गत व्यवहारांप्रमाणें आंतरराष्ट्रीय व्यापारी देणींघेणींहि हुंड्यांचे द्वाराच पुरीं केलीं जातात.

हिंदुस्थानांत व्यापारी हुंड्यांचा दुष्काळ आहे, अशी फार जुनी तक्रार आहे. शेतीचे मालावर आधारलेल्या हुंड्यांस सत्वर गिऱ्हाइक मिळून शेतकऱ्यांची सोय होऊं शकते व आपल्या मालाचा योग्य मोबदला तात्काळ मिळण्यास त्यांस सहाय होतें. अशा हुंड्यांचे तारणावर बँकांसहि मध्यवर्ती बँकेमार्फत स्वतःस अल्प दरानें कर्ज मिळण्याची सोय असल्यानें, ह्या स्वस्त दराचा फायदा शेतकऱ्यांपर्यंत पोचूं शकतो. तथापि, मालाचे तारणावर आधारलेल्या हुंड्या हिंदुस्थानांत फारच थोड्या प्रचलित असतात व त्यामुळें ही सवलत निकामी ठरते. शेतकरी स्वतः हुंडी काढीत नाहीं; त्याच्या मालाचा खरेदीदार काढतो. परंतु ह्या व्यापाऱ्याचा संबंध मोठ्या व्यापारी बँकांशीं क्वचितच असतो ह्या कारणानें त्याच्या हुंडीचा संबंध असल्या बँकांचे मार्फत रिझर्व्ह बँकेपर्यंत जाऊन भिडूं शकत नाहीं. हुंड्या रीडिस्कौंट करण्यास तयार असलेल्या रिझर्व्ह बँकेचा संबंध शेड्यूल्ड बँकांशीं येतो, परंतु शेतीचे मालावर आधारलेल्या हुंड्या ह्या बँकांकडे डिस्कौंट होण्यासाठीं येत नाहींत; कारण, हुंडीचा व्यवहार करणारे सराफ व सावकार ह्यांचे व्यवहार बँकिंगच्या आधुनिक तंत्रांत बसूं शकत नाहींत. जुन्या पद्धतीनें व्यवहार करणाऱ्या सराफांचा संबंध रिझर्व्ह बँकेशीं कसा जोडतां येईल व शेतीचे धंद्यास मध्यवर्ती बँक व तिच्याशीं संलग्न असलेल्या बँका ह्यांच्या पैशाचा उपयोग स्वल्प व्याजानें कसा होऊं शकेल, हा प्रश्न येथें महत्त्वाचा आहे. शेड्यूल्ड बँकांनीं ता. १३ मे रोजीं केवळ ६½ कोटि रुपयांच्या हुंड्या डिस्कौंट केलेल्या होत्या, असें त्या बँकांच्या वरील तारखेच्या संयुक्त ताळेबंदावरून दिसून येतें. ह्या आकड्यावरून हुंड्यांच्या खरेदींत हिंदी बँकांनीं किती अल्प रकम गुंतवलेली आहे, हें दिसून येईल.

हिंदी रिझर्व्ह बँक शेतकऱ्यांसाठीं काय करूं शकेल, ह्याविषयाचें विवेचन तिनेंच स्वतः प्रसिद्ध केलेल्या एका पत्रकांत केलें असून त्यांत अशा हुंड्यांचे आवश्यकतेवरच विशेष भर दिलेला आहे. मालाच्या भरभक्कम तारणावरील हुंड्या रिझर्व्ह बँक रीडिस्कौंट करण्यास तयार आहे; तथापि, अशा हुंड्यांची संख्याच अत्यल्प असल्यामुळें ही कागदी योजना निरुपयोगी ठरली आहे. हुंड्यांवरील स्टँप ड्यूटी कमी करून त्यांच्या प्रसारास चालना देण्याचा हिंदुस्थान सरकारनें उपक्रम करण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें मध्यवर्ती असेंब्लींत एक बिलहि आणलें. परंतु ह्या ड्यूटीमधील उतारामुळें येणारें नुकसान भरून काढण्यासाठीं सरकारनें चेक्सवर ड्यूटी बसविण्याचें योजिलें. हुंड्यांच्या प्रसाराबरोबर चेक्सची देवघेवहि वाढली पाहिजे, ह्याचा सरकारास विसर पडला असें म्हणावें लागतें. परंतु बिलास झालेल्या विरोधाची तीव्रता लक्षांत घेऊन सरकारनें त्याचा विचार पुढें ढकलला. हुंड्यांचे पतीवर रकमा काढण्याची संवय जनतेंत दृढमूल व्हावी, ह्या हेतूनें हुंड्यांवरील स्टँप ड्यूटी कमी करण्याविषयीं रिझर्व्ह बँकेचा आग्रह आहे.

ग्रेटब्रिटनमध्येंहि हुंड्यांचा व्यवहार घटला आहे. १९२९ सालानंतर १९३२–३३ पर्यंत हुंड्यांच्या परिमाणांत उतार होत गेला व त्यानंतर तें पुन्हां हळु हळु वाढूं लागलें. तथापि प्रगतीची गति अतिशय मंद आहे. हुंड्यांच्या देण्याघेण्यांशीं चाललेला व्यापार मंदावला अगर मालाचे बाजारभाव घटले म्हणजे सहाजिकच हुंड्यांच्या रकमेंत उतार झालेला आढळून येतो. बाजारभाव उतरले म्हणजे आर्थिक उलाढालींवर प्रतिकूल परिणाम होतो व त्या उलट, व्यापार मंदावला म्हणजे बाजारभाव उतरतात. ह्या दोन्ही गोष्टी एकदमच घडून येतात. १९२९ ते १९३२ ह्या दरम्यान ह्यामुळेंच हुंड्यांच्या किंमतींत ब्रिटनमध्यें घट झाली. १९३३ नंतर बाजारभाव सुधारले व व्यापारवृद्धीहि घडून आली आणि त्याचा परिणाम हुंड्यांचे व्यवहारावर झाला. तरी पण परराष्ट्रीय हुंड्यांचा दुष्काळ अद्याप कायम आहे. लंडन शहराची आंतरराष्ट्रीय व्यापाराचें केंद्र म्हणून ख्याती होती, ती आतां राहिलेली नाहीं. अंतर्गत व्यापारी हुंड्यांची जागा सरकारी ट्रेझरी बिलांनीं थोडीफार घेतली आहे. तथापि सरकारास ट्रेझरी

विलाऐवजीं दुसऱ्या मार्गानें स्वस्त दरानें कर्ज उभारता आलें, तर तें ट्रेझरी बिलांची विक्री करण्याचें सोडून देईल व लांब मुदतीच्या कर्जांत त्यांचें रूपांतर करील. ट्रेझरी बिलांच्या खरेदी-विक्रीचा व्यवहार अगदीं मामुली पद्धतीचा झाला असून त्यांच्या खरेदी-विक्रींत नफ्यास कुसहि विशेष राहिलेली नाहीं. हीं बिलें डिस्कौंट केलीं जाऊन चलन सैंकतें रहातें, परंतु व्यापारी देवघेवीस हुंड्यांप्रमाणें त्यांचा उपयोग होत नाहीं. हुंड्यांच्या संख्येंत झालेल्या उतारावर काय उपाययोजना करावी, ह्याविषयीं ग्रेट ब्रिटनमध्यें चर्चा चालू आहे. ब्रिटिश बँकांच्या प्रसिद्ध होणाऱ्या आढाव्यांत बिलांचा आंकडा दिलेला असतो, त्यांत मुख्यत्वेंकरून सरकारी टेझरी बिलांचाच समावेश केलेला असतो. हे आकडे, त्यामुळें, व्यापारी हुंड्यांच्या उलाढालीचे दृष्टीनें वस्तुस्थितिनिदर्शक समजतां येत नाहींत; उलट, आकडे सांगतात त्यापेक्षा प्रत्यक्ष परिस्थिति निराळी असल्याचें दिसून येतें. ट्रेझरी बिलें व व्यापारविषयक हुंड्या ह्यांचे आकडे ब्रिटिश बँकांच्या साप्ताहिक ताळेबंदांत स्वतंत्र दाखविण्यांत आले नसले तरी ह्या जातीच्या हुंड्यांचें दुर्भिक्ष थोडी चौकशी केली असतां स्पष्ट होतें.

ग्रेट ब्रिटन व हिंदुस्थान ह्यांच्या परिस्थितीमध्यें एक महत्त्वाचा फरक आहे. ग्रेट ब्रिटनमध्यें हुंड्यांचा प्रसार करण्यासाठी श्रीगणेशापासून प्रारंभ करावयास नको आहे; हुंड्यांची लोकप्रियता पुनः प्रस्थापित करण्याचाच केवळ तेथें प्रश्न आहे. हिंदुस्थानांत रिझर्व्ह बँकेच्या स्थापनेमुळें शेतकऱ्यांस कांहीं सवलती मिळतील, अशी आशा उत्पन्न करण्यांत आलेली आहे. शेतकऱ्यांच्या हुंड्या बँकांमार्फत आल्यास त्या अल्प दरानें रीडिस्कौंट करून ह्या स्वल्प व्याजाच्या दराचा फायदा शेतकऱ्यांस मिळवून देण्याचा रिझर्व्ह बँकेचा विचार आहे. ह्या बाबतच्या आपल्या अटी सैल करण्यास बँक तयार नाहीं व हुंड्यांची संख्या वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यासहि ती उत्सुक नाहीं. रिझर्व्ह बँकेजवळील पैशाची उपयुक्तता शेतकऱ्यांचे वांट्यास येण्यासाठी हुंड्यांचें माध्यम आवश्यक झालें आहे. हुंड्या लोकप्रिय करण्याचें काम मात्र बँक करीत आहे असें दिसत नाहीं. त्यामुळें शेतीचे धंद्यास सहज मिळूं शकणाऱ्या सहाय्यास मुकावें लागत आहे व रिझर्व्ह बँकेच्या बँकिंगविषयक कार्यांतहि एकसूत्रीपणा येणें कठीण होणार आहे. शेतीच्या धंद्याविषयीं रिझर्व्ह बँकेस सहानुभूति वाटत असेल, तर तिनें हुंड्या लोकप्रिय करण्याची खटपट केली पाहिजे. स्वतः होऊन बँकेच्या सवलतींचा फायदा घेण्याइतकी शेतकऱ्यांची आज तयारी नाहीं. हें पूर्वतयारीचें काम मध्यवर्ती बँकेच्या पुरस्कारानेंच होणें उचित आहे.

बावडा दप्तर

("पंत अमात्य बावडा दप्तर भाग १ ला"–संपादक–श्री. केशव गोविंद सबनीस, बी. ए., सेक्रेटरी, ज. बावडा–पृ. सं. २१८ किं. २ रु.)

कोल्हापूर संस्थानांतील बावडा जहागिरीच्या इतिहासाचें मूळ शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेविषयींच्या खटाटोपांत सापडतें. बावडा घराण्यांतील प्रमुख कार्यकर्ता, रामचंद्र नीलकंठ, पंत अमात्य, ह्यानें राजाराम महाराजांचे कारकीर्दींत मराठी राज्याचा संकटसमयीं केलेली अपूर्व कामगिरी इतिहासज्ञांस अवगत आहे. ह्या घराण्याच्या दप्तरांतील जुने लेख विशेष महत्त्वाचें असणें स्वाभाविक आहे. सध्याचे पंत अमात्य, श्रीमंत भाऊसाहेब, ह्यांच्या प्रेरणेनें श्री. सबनीस ह्यांनीं हे लेख निवडून छापून प्रसिद्ध करण्याचें काम आपल्या अंगावर घेतलें ह्याविषयीं त्यांचें अभिनंदन करणें अवश्यक आहे. प्रस्तुत भागांतले बहुसंख्य लेख कै. वा. वि. का. राजवाडे ह्यांच्या आठव्या खंडांत प्रसिद्ध झाले आहेत; तथापि तो खंड आतां दुर्मिळ झाल्यानें त्यांचें पुनः प्रकाशन अत्यंत उपयुक्त आहे. शिवकालीन कागद्पत्र मिळणें अतिशय कठीण आहे आणि त्या कारणानें तत्कालीन आर्थिक, सामाजिक आणि राज्यकारभार-विषयक परिस्थितीचें यथातथ्य ज्ञान होण्यास अडचण भासत आहे. बावडा दप्तराचे ह्याच्या पुढचेहि भाग जिज्ञासूंस महत्त्वाचे वाटल्यावांचून रहाणार नाहींत. प्रस्तुत भागास रियासतकार, रा. ब. सरदेसाई, यांची परिचय पत्रिका जोडली आहे, ती उद्बोधक आहे. शेवटीं जोडलेली सूचीहि उपयुक्त आहे.

जुने मोडी कागद वाचतांना, अक्षरसादृश्य, मूळ लेखकाचा प्रमाद आणि वाचणाराचा गैरमाहितपणा ह्यांचे योगानें सहज चुका होतात, हा संशोधकांचा सामान्य अनुभव आहे. ह्या चुका टाळणें व नजरेस आणणें ही महत्त्वाची शास्त्रीय कामगिरी आहे. तिच्याकडे श्री. सबनीस ह्यांचें लक्ष आहेच. तरीहि, ह्या बाबतींत सावधगिरीची सूचना करणें अवश्यक आहे असें वाटतें. प्रस्तुत पुस्तकाचीं पानें चाळतांना एक गोष्ट ध्यानांत आली तिचा उल्लेख येथें उदाहरणार्थ करतों. अनुक्रमांक ८, २२, २५, ४१ आणि ५५ ह्यांत निर्दिष्ट केलेलें इनाम एकाच गांवांतील विशिष्ट जमिनीचें आहे. तथापि, टिपांमध्यें गांवाचा उल्लेख निरनिराळ्या प्रकारांनीं केला आहे. तसेंच, पुढील पत्रांत हरी गोविंद हा रामचंद्र नीलकंठ ह्यांच्या मातुल वंशांतील असल्याचें स्पष्ट म्हटलें असून आणि संपादकीय टिपांतहि त्याचा अनुवाद केला असून क्रमांक ८ खालील इंग्रजी टिपेंत वरील संबंधाविषयीं अनिश्चयात्मक भाषा वापरली आहे. त्याचप्रमाणें, उपरिनिर्दिष्ट इनाम जमिनीचें निरनिराळ्या अनुक्रमांकांतील वर्णनाचें वाचन नीट झालें आहे असें दिसत नाहीं. ह्या गोष्टी बारीक तपशिलाच्या आहेत खऱ्या, पण चिकित्सक दृष्टीनें महत्त्वाच्या आहेत. पुढें प्रसिद्ध होणाऱ्या पत्रांचें वाचन शास्त्रशुद्ध रीतीनें समाधानकारक व्हावें ह्याच उद्देशानेंच केवळ प्रस्तुत सूचना केली आहे. असो. जुन्या कागदपत्रांचें महत्त्व जाणणारे विरळा. ते जमा करून प्रसिद्ध करणारे अधिक विरळा. म्हणून श्री. सबनीस ह्यांनीं आपलीं नित्याचीं जबाबदारीचीं अनेक कामें संभाळून इतिहासप्रेमानें बावडा दप्तराची तपासणी करण्याचें आणि त्यांतील निवडक कागद प्रसिद्ध करण्याचें कार्य शिरावर घेतलें ह्याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत. तसेंच, श्रीमंत भाऊसाहेब पंडित पंतअमात्य ह्यांनीं या कामीं प्रोत्साहन आणि सहाय दिलें, याबद्दल महाराष्ट्रीय जनता त्यांची ऋणी आहे. बावडा दप्तराचे पुढचे भाग क्रमाक्रमानें लवकर प्रसिद्ध होतील अशी आशा आहे.

मुलींचें
आगरकर हायस्कूल, पुणें
उन्हाळ्याच्या सुटीनंतर ता. ६ जून, १९३८ रोजीं उघडेल. प्रत्येक वर्गांत फक्त मर्यादित संख्याच घेणें आहे. तरी पालकांनीं त्वरित नांवें नोंदवावीत. प्रत्येक वर्गांत जागा असेल त्या मानानें गुणानुक्रमानें बाहेरील मुलींस दाखल करून घेतलें जाईल. नांव नोंदणीसाठीं शाळेचें ऑफिस दररोज सकाळीं ८ ते १० उघडें असतें. माहितीपत्रक मागवणें असल्यास सेक्रेटरी, आगरकर हायस्कूल, यांस पत्र टाकावें.
इंदिरा आठाव, M. A., B. T., प्रिन्सिपॉल.

स्फुट विचार

पांच मिनिटांत खलास !

हिंदुस्थान सरकारच्या नव्या कर्जाच्या रोख्यांस जरूरीच्या मानानें अधिक मागणी आल्यामुळें त्यांची विक्री चालू झाल्यापासून पांचच मिनिटांत बंद करावी लागली. ही गोष्ट अपेक्षितच होती. सरकारास कर्ज हवें होतें, तें मर्यादित रकमेइतकेंच होतें. कारण त्याचा उपयोग जुन्या कर्जाच्या फेडीसाठीच मुख्यत: करावयाचा होता. दुसऱ्या बाजूनें विचार करतां, पैसे गुंतविणारांची सरकारी रोख्यांबद्दल मागणी फार होती. मध्यम स्थितींतल्या वर्गास सरकारी रोखे बचत केलेला पैसा गुंतवण्यास अत्यंत आकर्षक वाटतात. साडेतीन टक्क्यांच्या प्रामिसरी नोटा बिनमुदतीच्या असल्यानें त्या ही गरज समाधानकारक रीतीनें भागवूं शकत नाहींत. फार जवळची नाहीं आणि फार दूरची नाहीं अशी कर्जरोख्यांची मुदत लोकांस विशेष पसंत पडते. तसेंच, विमा कंपन्या सारख्या मंडळ्यांस आणि सार्वजनिक संस्थांसहि असल्या प्रकारच्या रोख्यांत पैसे गुंतवून ठेवणें सोयीचें वाटतें. साडेपांच व पांच टक्यांच्या जुन्या कर्जरोख्यांच्या मोबदला तीन टक्के व्याजाचे नव्या कर्जाचे रोखे घेण्याची लोकांची आतुरता आणि आपले पैसे नव्यानेंच ह्या कर्जात गुंतविण्याची लोकांची तीव्र इच्छा ह्यांचा उलगडा वरील स्पष्टीकरणानें सहज होईल. कर्जाबद्दल अर्ज घेणें पांच मिनिटांतच बंद झाल्यानें अनेक लोकांस परत जावें लागून त्यांची मोठी निराशा झाली. बँकांची विशेष सोय केली गेल्याविषयीं त्यांनीं तक्रार करावी हें स्वाभाविक आहे. जरूरीपेक्षां मागणी अधिक झाल्या कारणानें रोखीनें खरेदी करणारांमध्यें रोख्यांची वांटणी करण्यांत आली आहे. पांच हजारांपर्यंतची मागणी पूर्णपणें स्वीकारण्यांत येऊन त्यावरील रकमांच्या निम्म्या इतके रोखे दिले जातील आणि बाकी रकमा अर्जदारांस परत मिळतील. उतरलेल्या व्याजाच्या दराचा फायदा सरकारनें नवीन कर्जाच्या बाबतींत घेतला असून त्या योगानें तिजोरीच्या खर्चांत बचत होणार आहे. साडेपांच टक्के दराच्या कर्जाची फेड १९४० मध्यें आणि पांच टक्के दराच्या कर्जाची १९४४ मध्यें कराराप्रमाणें सरकारास करतां आली असती १९३९–४४ मुदतीच्या कर्जाची परत फेड करण्याची जबाबदारी यंदा सरकारावर नव्हती. पण कमी व्याजानें पैसे मिळत असतां भारी दरानें व्याज देत बसणें चुकीचें झालें असतें; आणि परिस्थितीमुळें जुन्या-नव्या कर्जरोख्यांची अदलाबदल करणें सरकारास शक्य होतें.

नवीन कर्जास प्रचंड मागणी

हिंदुस्थान सरकारनें नुकत्याच उभारलेल्या ३ टक्के दराच्या १५ कोटि रुपयांच्या कर्जास रोख्यांची विक्री थांबविण्यापूर्वी, सुमारें २५½ कोटि रुपयांच्या रोख्यांची मागणी खालीलप्रमाणें नोंदली गेली:--

५½ टक्के रोख्यांचे बदली ...	११,३९,००,००० रु.
५ टक्के " "	८,०४,००,००० रु.
एकूण सुमारें	१९,५०,००,००० रु.
रोख पैशाचे मोबदला नवीन रोखे (मागणीच्या ५०%) सुमारें	६,००,००,००० रु.
	२५,५०,००,००० रु.

वरील रकमेंत पोस्टामार्फत आलेल्या अर्जातील मागणीचा समावेश केलेला नाहीं. जुन्या कर्जाचे ऐवजी स्वल्प दराचें नवीन कर्ज सरकारची बचत करणारें असल्यानें, रोखे बदलून मागणारे सर्व अर्ज सरकार स्वीकारील, हें उघड आहे. ५½% दराच्या १९३८–४० सालीं फेडावयाच्या कर्जाची व ५% दराच्या १९३९–४४ सालीं परतफेड करावयाच्या कर्जाची मिळून एकूण रकम ४७½ कोटि रुपये आहे. ह्या कर्जापैकीं निम्म्यापेक्षा थोडें कमी कर्ज वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें ३ टक्के दरांत आतां वर्ग होणार आहे. बाकीच्या कर्जाची व्यवस्था लावण्यास अद्याप सवड आहे आणि त्याकरितां सरकार पुढें दुसरें कर्ज काढील असा अंदाज आहे.

बाहेरील तज्ञांच्या नेमणुकी केव्हां थांबणार ?

नवीन विमा कायद्यास अनुसरून ' सुपरिंटेंडंट ऑफ इन्शुअरन्स ' ह्या तज्ञ अधिकाऱ्याची नेमणूक व्हावयाची होती. ह्या जागेवर हिंदी माणूस नेमला जावा आणि बाहेरून तज्ञ आणण्याचें धोरण हिंदुस्थान सरकारनें सोडून द्यावें असें मत मध्यवर्ती असेंब्लीमध्यें स्पष्टपणानें व्यक्त करण्यांत आलें होतें. तथापि, त्यास न जुमानतां सरकारनें एका युरोपिअनाची नेमणूक केली आहे. त्या धोरणाचा हिंदी व्यापारीसंघ निषेध करीत आहेत ह्यांत आश्चर्य नाहीं. निरनिराळ्या क्षेत्रांतले तज्ञ हिंदुस्थानांत उपलब्ध नसल्यानें अधिक पगार देऊनहि त्यांस विलायतेमधून आणावें लागतें आणि ह्या देशाच्या हिताच्या दृष्टीनें तें इष्ट आहे असा युक्तिवाद मागें करण्यांत येत असे. जबाबदारीच्या व तज्ञांच्या जागांवर हिंदी लोकांनीं त्यांस संधी मिळतांच अत्यंत समाधानकारक रीतीनें कामें करून दाखविलीं असतांहि नवीन जागा निर्माण होतात तेव्हां बाहेरील लोक त्यांसाठी आणण्यास सरकार अजूनहि चुकत नाहीं. परकीय तज्ञ लायक असतात कीं नाहीं, हा प्रश्न येथें नसून त्यांच्या योग्यतेचे हिंदी तज्ञ मिळण्यासारखे असूनहि त्यांच्या नेमणुकी केल्या जात नाहींत ही खरी तक्रार आहे. हिंदी लोकांवरचा अशा प्रकारचा अविश्वास समर्थनीय नाहीं, एवढेंच नाहीं तर तो ह्या देशास हानिकारक व अपमानकारकहि आहे. ह्या दृष्टीनें सरकारनें प्रस्तुत प्रश्नाकडे पहाणें आवश्यक आहे.

हिंद–ब्रिटन व्यापारी कराराची ओढाताण—तिरंगी सामना

हिंदुस्थान आणि ग्रेट ब्रिटन ह्यांचेमध्यें होऊं घातलेल्या व्यापारी कराराच्या वाटाघाटी गेल्या आठवड्यांत निकरास आल्या. हिंदी व्यापारी प्रतिनिधींचें शिष्टमंडळ इंग्लंडला जाऊन आलें तरी त्यांचा निकाल लागूं शकला नाहीं. स्वत:स विशेष व्यापारी सवलती मिळविण्याविषयींचा लँकेशायरच्या गिरणीवाल्यांचा आग्रह ह्या दिरंगाईस बराच कारणीभूत झालेला आहे. मँचेस्टरच्या कापडाचा खप हिंदुस्थानांत अत्यंत मर्यादित झाला आहे त्यास सवलती दिल्या जाव्या आणि त्यांच्या मोबदला हिंदी कपाशीच्या विलायतेंतील उठावास आपण सहाय करूं असें त्यांचें म्हणणें आहे. हिंदी कपास लँकेशायरच्या गिरण्यांत निश्चितपणानें खपणें येथील व्यापाऱ्यांस इष्ट वाटत असून त्यासाठी मँचेस्टरला मोबदल्यांत जकातीची सवलत द्यावी लागेल ह्याची त्यांस जाणीव आहे. तथापि, हा खप व सवलती ह्यांचें प्रमाण काय असावें ह्याबाबत मतभेद उत्पन्न झालेला आहे. प्रस्तुत भिजत पडलेल्या

प्रकरणाचा सोक्षमोक्ष करून घेण्याकरितां ब्रिटिश व्यापाऱ्यांचें शिष्टमंडळ नुकतेंच हिंदुस्थानांत आलें आणि सिमला येथें कराराच्या अटींची ओढाताण त्यांनीं चालविली. हिंदी कपाशीचे व्यापारी, हिंदी गिरणीवाले आणि मँचेस्टरवाले ह्या तिघांच्या वाटाघाटी सर महंमद झाफरुल्लाखान ह्यांच्या नेतृत्वाखालीं चालल्या असतां मतभेद इतक्या तीव्रतेस गेले कीं कोणतीच योजना सर्वमान्य होत नाहीं असें दिसूं लागलें. कपाशीचा भाव उतरल्यामुळें लँकेशायरची हिंदी मालाची खरेदी वाढली आहे. परंतु तिचें परिमाण निश्चित होऊन तेवढा उठाव प्रतिवर्षी मँचेस्टरच्या गिरण्या करतील ह्या विषयीं हिंदी प्रतिनिधींस निश्चिती पाहिजे आहे. मँचेस्टरवाल्यांस आपल्या कापडावरील हिंदी जकात कमी होऊन ह्या देशांत होणाऱ्या त्या मालाची आयात विशिष्ट मर्यादेपर्यंत निश्चयानें होऊं शकेल ह्या बेतानें सवलत हवी आहे. तें कापड अपेक्षेपेक्षां कमी आल्यास त्या मानानें जकात उतरवली पाहिजे असें त्यांचें मागणें आहे. ह्या तिरंगी सामन्यांत तडजोडीनें बरोबरी होईल अशी योजना आखण्याची सर महमद ह्यांची खटपट होती, ती अखेर अयशस्वी ठरली.

झांझिबारच्या लवंगा आणि हिंदी व्यापारी

झांझिबारमधील लवंगांचें उत्पादन आणि व्यापार ह्यांमध्यें हिंदी व्यापाऱ्यांनीं अनेक वर्षें आपलें बस्तान बसवलें होतें परंतु क्लोव्ह ग्रोअर्स असोसिएशन ह्या युरोपिअन व्यापारी संस्थेनें ह्या व्यापारांत आपलें वर्चस्व प्रस्थापित केलें आणि ब्रिटिश साम्राज्य सरकारच्या सहायानें त्यांत एक प्रकारची पूर्ण मक्तेदारी मिळवली. हिंदी व्यापाऱ्यांनीं ह्या व्यवस्थेविरुद्ध तक्रार केली, पण तिचा विशेष उपयोग झाला नाहीं. युरोपिअन असोसिएशनचा लवंगांच्या खरेदीचा मक्ता सरकारनें मर्यादित केला तरी तिचें वर्चस्व अबाधित राहिलें. बाहेर पाठविल्या जाणाऱ्या लवंगांचा व्यापार असोसिएशनच्या हातांतच राहिल्यानें हिंदी व्यापाऱ्यांचें गाऱ्हाणें दूर होऊं शकलें नाहीं. आपली योजना हिंदी व्यापाऱ्यांस अप्रिय असली तरी ती झांझिबारमधल्या अरब शेतकऱ्यांच्या हिताची आहे असा युक्तिवाद सरकार व असोसिएशन करीत असे. परंतु हें प्रकरण विशेष चिघळून हिंदुस्थानांत लवंगांवर बहिष्कार घालण्यांत आला. शेवटीं हिंदुस्थान सरकारनें आपला एक अधिकारी पाठवून तडजोड घडवून आणण्याचा प्रयत्न केला. विशिष्ट तडजोडीची योजना उभय पक्षांस मान्य झाली असल्याचें आतां प्रसिद्ध झालें आहे. तीमध्यें त्वयार्धम् मयार्धम्‌चा प्रकार स्पष्ट आहे. लवंगांचा निम्मा व्यापार ह्या योजनेप्रमाणें युरोपिअन असोसिएशनच्या हातीं राहील आणि निम्मा तिच्या मक्तेदारीमधून मोकळा होईल. ह्या व्यवस्थेच्या अंमलबजावणींत अडचणी उपस्थित झाल्या तरी त्या दोहोंबाजूंच्या समंजसपणानें दूर होऊं शकतील अशी आशा व्यक्त करण्यांत आली आहे.

किर्लोस्कर



२५ फुटांहून खोल विहिरीसाठीं किर्लोस्कर हुगळी पंपाची कामगिरी लोकांना फारच पसंत पडली आहे.

कारखान्याचे प्रतिनिधी आपल्यास भेटतील, त्यांना आपली गरज कळवा. म्हणजे आपल्या उपयोगी पडेल अशा किर्लोस्कर पंपाची निवड ते करून देतील किंवा थेट कारखान्यास लिहा. म्हणजे सविस्तर माहिती दिली जाईल.

हुगळी पंप

किर्लोस्कर हात व पावर पंपांचा सचित्र कॅटलॉग मागवा

किर्लोस्कर बंधु, लि. : किर्लोस्करवाडी, सातारा

अखिल भारतीय गो-प्रदर्शन, दिल्ली

जळगांव गिलिगन फार्मचें अनुकरणीय कार्य

-(२)

"गिलिगन फार्म व शेतकी असोसिएशन" ह्या संस्थेकडे जनतेचें अमावें तितकें लक्ष नसल्यामुळें खर्चाच्या बाबतींत त्या नुकसानींतच आहेत. त्यामुळें उत्तम गाई-बैल अधिक निर्माण करितां येत नाहींत. डि. लो. बोर्डाकडून १५०० रुपये व शेतकी खात्याकडून १००० रुपये दरसाल मदत मिळते. बाकीचा खर्च असोसिएशनला करावा लागतो. असोसिएशननें आतांपर्यंत कॅटल ब्रिडिंग फार्म करितां २५००० रुपये खर्च केले असून दरसालचा खर्च ७००० रुपये आहे. त्यामुळें ठराविक खर्चाच्या चाकोरींत अस्सल ब्रीड करून गाई-बैल जास्त निर्माण करितां येत नाहींत. तरी पण गिलिगन कॅटल फार्मवरील २३ जातिवंत वळू खान-देशांतील निरनिराळ्या गांवीं आतांपर्यंत दिलेले असून ११ उत्तम वळू शेतकऱ्यांना देण्याकरितां तयार आहेत. खान-देशांतील शेतकऱ्यांनीं सदर फार्मकडे अधिक लक्ष देऊन त्यास मदत केल्यास त्याचा फायदा शेतकऱ्यांना जास्त प्रमाणावर मिळेल.

टिपक्या ठिपक्याची (लाल काळ्या रंगाची) शोभा असलेल्या नेमाडी व धनी जातीच्या गाई दुधाला चांगल्या असून त्यांचे बैलहि शेतकामास चांगलें कणखर असतात. नेमाडी जात मध्य हिंदुस्थानांतील व धनी जात सरहद्द प्रांतांतील आहे. काठे-वाडी, गीर, सिंधी, थरपारकर पंजाबांतील हरियाना साहिवाल, ह्या जाती विशेष करून शेतकामास अत्यंत उपयुक्त असून माळव्यांतील माळवी व कृष्णाकांठी या जाती दूध व शेतकाम या दोन्ही दृष्टींनीं उपयोगी आहेत.

वरील सर्व जातींचीं अधिकृत लक्षणें ठरवून ह्या दृष्टीनें त्या त्या लक्षणांची व तदनुषंगिक गुणांची वाढ करणें हें खरें गोसं-वर्धन आहे. आणि हेंच धोरण गिलिगन फार्मवर उत्तम रितीनें पाळलें जात आहे.

दिल्ली येथील अखिल भारतीय गो-प्रदर्शनांत शेतकी असो-सिएशन व गिलिगन फार्म यांचा गुणगौरव बक्षिसद्वारें झाला. प्रदर्शनाचे मुख्य चालक व हिंदुस्थान सरकारचे पशु तज्ज्ञ हे प्रदर्शनापूर्वी येथें येऊन गिलिगन फार्म पाहून गेले त्यावेळीं उत्तम प्रदर्शनीय गाय व बैल यांचे त्यांनीं फोटो नेले होते. ते प्रदर्शनसमयीं हिंदुस्थानांतील निरनिराळ्या जातींच्या गाई-बैलांची माहिती देणाऱ्यास आदर्श म्हणून दिले आहेत. गिलिगन फार्मचें लोण हिंदुस्थान सरकारपर्यंत जाऊन पोहोचलें आहे. श्री. साळुंखे यांच्या प्रयत्नास गोसंवर्धन संस्था, सरकार, स्थानिक संस्था व शेतकरी बंधू सक्रिय सहानुभूति दाखवतील अशी आशा आहे. (समाप्त)

शिंदखेडें तालुका को. सुपरवायझिंग यूनियन लि., शिंदखेडें

असि. रजिस्ट्रार यांनीं शिंदखेडे तालुक्यांत मागील महिन्याचे २६ व २७ तारखांना दौरा काढून व नरडाणे, शिंदखेडा व दोंडाईचे या तिन्ही ठिकाणीं सोसायट्यांच्या पुढाऱ्यांना बोलावून त्यांना नवीन व्यक्तिशः सवलतीची योजना समजावून सांगितली व जमलेल्या पुढाऱ्यांशीं शेतकऱ्यांची सद्यःस्थिती व त्यावरील उपाययोजना याविषयीं उहापोह केला. व्यक्तिशः सवलतीच्या योजनेचा पूर्ण फायदा घेण्याविषयीं व उपस्थित बिकट परिस्थितीस धैर्यानें तोंड देण्याविषयीं त्यांनीं जमलेल्या सभासदांस कळकळीचा उपदेश केला.

अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें अत्यंत लोकप्रिय
झारापकर टेलरिंग कॉलेज
आप्पा बळवंत चौक, पुणें १
[माहितीपत्रक मागवा]

घरच्या घरीं संगीत कलेंत प्राविण्य मिळविण्यास
सर्वोत्कृष्ट-सचित्र-सुबोध-माहितीपूर्ण
संगीत-मार्गदर्शक
मालेचीं पुस्तकें.

गायन	हार्मोनियम	दिलरुबा	फिडल्
किं. ६ आ.	किं. २॥ रु.	किं. १ रु. २ आ.	किं. १ रु. ४ आ.

व्ही. पी. नें चार आणे जास्त पडतील.
प्रभा संगीत विद्यालय, फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणें ४.

स्वल्प व्याजानें कर्ज

ता. २७ जून १९३८ रोजीं पहिल्या कर्ज वांटणीस कंपनीच्या नियमानुसार श्री. ग. स. मराठे यांच्या सल्याप्रमाणें सुरवात होणार असून पूर्ण पैसे भरून सर्टिफिकेट घेणा-रांचेच नंबर कर्ज वांटणीच्या यादींत समाविष्ट होतील तरी ज्यांनीं पूर्ण पैसे भरले नसतील त्यांनीं ते तावडतोब भरावेत व स्वल्प म्हणजे ६॥% व्याजानें रु. १०० ते ५००० (सर्टि-फिकिटचें प्रमाणें) कर्ज घेऊं इच्छिणारांनीं अवघे रु. २४ भरून, सर्टिफिकेट्स घेण्याची त्वरा करावी. तारखेकडे लक्ष ठेवा. गांवोगांवीं एजन्टस पाहिजेत. प्रॉस्पेक्टस व एजन्सीसाठीं ८= चीं तिकिटें पाठवा. अगर समक्ष भेटा.

दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि.
हेड ऑफिसः—गिरगांव, मुंबई.
ब्रँचः—लक्ष्मी रोड, काकाकुवा मॅन्शन समोर, पुणें नं. २.

दि साऊंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.
[स्थापना सन १९३५]
९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर
कामाची वेळः—
दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १
चालू ठेवी द. सा. द. शे. २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.
सेव्हिंग बँक ठेवींवर द. सा. द. शे. ३ टक्के व्याज दिलें जातें.
मुदतीच्या ठेवी ३ महिन्यांपासून ३ वर्षांपर्यंत स्वीकारल्या जातात. व्याजाचे दराबद्दल बँकेकडे चौकशी करावी.
कर्जः सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात.
मॅनेजिंग एजंटस्.

फोर्ट (मुंबई) विभागांतील सहकारी परिषद

फोर्ट (मुंबई) विभागांतील सहकारी सोसायट्यांच्या मॅनेजिंग कमिटींतील सभासदांची तिसरी परिषद ता. ९ एप्रिल व ७ मे १९३८ रोजीं मि. के. जे. दुभाष यांचे अध्यक्षतेखालीं भरली होती, त्यावेळीं खालील ठरावावर चर्चा होऊन ते मंजूर झाले:–

(१) आर्बिट्रेशनचे निकाल लवकर व्हावेत, अशी रजिस्ट्रारला विनंति, (२) सोसायट्यांकडून घेण्यांत येणारी ऑडिट फी कमी करावी, व (३) सहकारी हौसिंग सोसायट्यांकडील रकमांवरील व्याजांत सवलत मिळावी, अशी मागणी, (४) कायद्याच्या दुरुस्तीस सहकारी खात्यानें त्वरित मान्यता द्यावी, अशी शिफारस, (५) सोसायट्यांच्या दप्तरांत व हिशेबाचे पद्धतींत एकवाक्यता घडवून आणण्याविषयीं सरकारास शिफारस, (६) श्री. दुभाष, वैकुंठराय मेहता, आर. एन. मेहता व व्ही. पी. वर्दे ह्यांची सोसायट्यांस त्यांचें भांडवल गुंतविण्याचे कामीं सल्ला देण्याकरितां कमिटीची नेमणूक, (७) मुंबई सहकारी इन्शुअरन्स सोसायटींत विमा उतरविण्याविषयीं सहकारी सोसायट्यांचे सभासदांस विनंति, इत्यादि.

सरकारी नोकरानें आपल्या नोकरीबाहेर इतर क्षेत्रांत काम केल्यास त्यानें त्यास मिळणाऱ्या सालिना वेतनापैकीं ५० रुपये स्वतःसाठीं ठेवावे व त्यावरील रकमेपैकीं एक तृतीयांश भाग सरकारकडे द्यावा, असा १९३५ सालीं हिंदुस्थान सरकारनें हुकूम सोडला होता. सहकारी सोसायट्या सरकारी नोकरांच्या असल्यास अशा संस्था व त्यांचे पगारी व बिनवेतन काम करणारे नोकर व अधिकारी ह्यांस हा नियम लागू करूं नये, अशी सरकारास विनंति करण्यांत आली होती; तथापि ती मान्य झाली नाहीं. सरकारी नोकर-सभासदांच्या सोसायट्यांस सर्व काम संभाळणारे नोकर ठेवतां येणें नेहेमीच शक्य होत नाहीं व विनामूल्य काम करणाऱ्या सभासदांस थोडाफार मोबदला द्यावा लागतो. वरील हुकमान्वयें, असा मोबदला सालिना ५० रुपयांचेपेक्षां जास्त भरल्यास, त्यापैकीं कांहीं भाग त्यांस सरकाराकडे जमा करावा लागतो. त्याची भरपाई सोसायट्यांस करावी लागून ह्या पैशाचा बोजा त्यांचेवरच पडतो. हिंदुस्थान सरकारनें आपल्या हुकुमांत दुरुस्ती करून सरकारी नोकर–सभासदांच्या सोसायट्यांस वरील नियम लागू करूं नये, असाहि एक ठराव परिषदेनें मंजूर केला.

श्री. प्रधान ह्यांनीं तयार केलेला तक्ता

मुंबई प्रांतांतील सहकारी सोसायट्यांचे रजिस्ट्रार ह्यांनीं काढलेल्या ता. ४-१०-३७ च्या जा. नं. ए. जी. सी. २९० च्या सरक्युलरमध्यें सांगितल्याप्रमाणें "तुंबलेली थकबाकी," "संशयित कर्ज" "बुडीत कर्ज" वगैरे कर्जाची प्रतवारी ठरविण्यासाठीं सहकारी सोसायट्यांचे ऑडिटर, श्री. ग. कृ. प्रधान, सोलापूर, ह्यांनीं एक तक्ता तयार केला आहे. हा तक्ता भरण्यासंबंधीं महत्त्वाच्या तपशीलवार सूचनाहि त्यावर छापल्या आहेत. २५ प्रतींस १२ आणे, अगर १ प्रतीस अर्धा आणा, अशी त्यांची किंमत आहे. टपाल खर्च वेगळा पडेल.

सहकारी अर्बन बँक परिषद

पुणें जिल्हा को. इन्स्टिट्यूटचे विद्यमाने पुणें जिल्ह्यांतील सर्व अर्बन बँका व अर्बन सोसायट्या ह्यांची परिषद पुणें येथें येत्या जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यांत भरविण्याचें निश्चित करण्यांत आलें आहे. याच परिषदेस जोडून जिल्हा शिक्षक सोसायट्यांची सभा पुणें येथें भरविण्याचें ठरलें आहे.

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् कोऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

(सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली)

स्थापना १९११.

मुख्य कचेरी—अपोलो रस्ता, कोट मुंबई.

शाखा

१ बारामती (जि. पुणें)	१६ अकलूज (जि. सोलापूर)
२ सातारा („ सातारा)	१७ विरमगांव („ अहमदाबाद)
३ इस्लामपूर („ „)	१८ धुळें („ प. खानदेश)
४ कऱ्हाड („ „)	१९ दोंडाईचें („ „)
५ तासगांव („ „)	२० शिरपूर („ „)
६ किर्लोस्करवाडी („ „)	२१ शहादें („ „)
७ शिराळें („ „)	२२ नंदुरबार („ „)
८ कोरेगांव („ „)	२३ साक्री („ „)
९ भिवंडी („ „)	२४ शिंदखेडें („ „)
१० अहमदनगर („ अहमदनगर)	२५ तळोदें („ „)
११ शेवगांव („ „)	२६ मालेगांव („ नाशिक)
१२ कोपरगांव („ „)	२७ सटाणा („ „)
१३ वाई („ ठाणें)	२८ कळवण („ „)
१४ पालघर („ „)	२९ दोहद („ पंचमहाल)
१५ कल्याण („ „)	३० कालोला

खेळतें भांडवल रु. २०००००००चे वर

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

फक्त नोंदलेल्या सहकारी पतपेढ्यांनाच कर्जें दिलीं जातात.

शिवाय

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

रत्नागिरी येथील वसंत व्याख्यान माला

प्रो. काळे ह्यांचीं व्याख्यानें

रत्नागिरी येथील वसंत व्याख्यान मालेचा उद्घाटनसमारंभ प्रो. काळे ह्यांच्या हस्तें गेल्या तारीख १५ रोजीं झाला. त्याप्रसंगीं "जागतिक घडामोडींत हिंदुस्थानचें स्थान" ह्या विषयावर त्यांनीं भाषण केलें. आंतरराष्ट्रीय राजकीय परिस्थितीचें सिंहावलोकन करून महायुद्धानंतर त्या क्षेत्रांत झालेल्या घडामोडींचें स्वरूप व्याख्यात्यांनीं विशद करून सांगितलें. राष्ट्रसंघाचा कमकुवतपणा, लहान व अल्पबल राष्ट्रांची असहाय स्थिति, आंतरराष्ट्रीय राजकारणांत बळी तो कान पिळी हा न्याय, इत्यादि बाबींवरून हिंदुस्थाननें राष्ट्रीय एकीकरणाच्या महत्त्वासंबंधानें काय बोध घेतला पाहिजे ह्याचें त्यांनीं विवेचन केलें. आर्थिक क्षेत्रांतहि गेल्या पांच–दहा वर्षांत झालेल्या फेरबदलाचें स्वरूप प्रो. काळे ह्यांनीं समजावून सांगितलें. आंतरराष्ट्रीय व्यापार, स्वदेशी उद्योगधंद्यांचें संरक्षण व वाढ, राष्ट्रीय चलनांची स्थिति, इत्यादि विषयांची उद्बोधक माहिती प्रो. काळे ह्यांनीं दिली आणि त्याहि संबंधांत हिंदी जनतेचें काय कर्तव्य आहे ह्याची श्रोतृवर्गास जाणीव करून दिली. राजकारण, अर्थकारण आणि संस्कृति ह्यांचे बाबतींत या रीतीनें झपाट्यानें क्रांति होत असतां हिंदी जनतेनें डोळसपणानें आपले आचारविचार निश्चित केले पाहिजेत, इतरांचें अंधानुकरण मात्र उपयोगी नाहीं, हा व्याख्यात्यांच्या भाषणाचा मथितार्थ होता. व्याख्यानांचा उद्देश ज्ञानाचा प्रसार करणें हा आहे आणि ज्ञानावांचून योग्य कार्य अशक्य आहे. व्यक्ती आणि समाज ह्यांची प्रगति ज्ञानमूलक आचारविचारावर अवलंबून आहे असें सांगून प्रो. काळे यांनीं व्याख्यान मालेचें उद्घाटन केलें. प्रास्तविक भाषण, श्री. गजाननराव पटवर्धन, ह्यांनीं केलें आणि अध्यक्षस्थान श्री. रामभाऊ अभ्यंकर ह्यांस देण्यांत आलें होतें.

रत्नागिरी येथें कॉमनवेल्थ विमा कंपनीचा गौरव

प्रो. काळे ह्यांच्या सन्मानार्थ समारंभ

वसंत-व्याख्यान-मालेच्या उद्घाटन समारंभाचे प्रसंगानें प्रो. काळे रत्नागिरीस गेले असतां कॉमनवेल्थ विमा कंपनीचे मुंबईचे चीफ एजंट, श्री. गजाननराव पटवर्धन, ह्यांनीं त्यांच्या सत्कारसमारंभाची योजना केली होती. कंपनीचे मॅनेजिंग एजंट, श्री. रामभाऊ अभ्यंकर, ऑडिटर श्री. आपटे, भाई गोरे इत्यादि मंडळी समारंभास उपस्थित होती. म्युनिसिपल हॉलमध्यें नगराध्यक्ष, श्री. पुरोहित, ह्यांच्या अध्यक्षतेखाली समारंभ साजरा झाला. श्री. पटवर्धन आणि श्री. अभ्यंकर ह्यांनीं कॉमनवेल्थ कंपनीच्या कार्याची व प्रगतीची माहिती सांगून रत्नागिरी जिल्ह्यानें त्यास दिलेल्या सहायासंबंधानें कृतज्ञता व्यक्त केली. महाराष्ट्राची आर्थिक घटना ह्या विषयावर प्रो. काळे ह्यांनीं भाषण केलें आणि त्यांत उद्योगधंदे व व्यापार ह्यांचेसंबंधांत महाराष्ट्राच्या परिस्थितीचें सिंहावलोकन करून पुढील कार्याची दिशा दाखविली. कॉमनवेल्थ कंपनीच्या उदाहरणावरून ह्या कार्याचें स्वरूप कसें असलें पाहिजे हें त्यांनीं सांगितलें आणि यशप्राप्तीसाठी कोणते गुण महाराष्ट्रीयांचे अंगीं बाणले पाहिजेत ह्याचें विवेचन केलें. श्री. अभ्यंकर व श्री. पटवर्धन ह्यांच्या कार्याचा गौरव व्याख्यात्यांनीं केला आणि औद्योगिक प्रगतींत अलीकडे महाराष्ट्राचें पाऊल पुढें पडत असल्याविषयीं समाधान व्यक्त करून ती टिकाऊ आणि फलदायी होण्यास परस्पर–विश्वास संघटन व शिस्त ह्यांचें विशेष महत्त्व असल्याचें त्यांनीं सांगितलें. कोंकणांतली नैसर्गिक परिस्थिति विशिष्ट असल्यानें स्कॉटलंडप्रमाणें तेथील लोकांनीं बाहेर व्यवसाय प्रस्थापित करून आपली उन्नति करून घेतली पाहिजे असा सल्ला व्याख्यात्यांनीं दिला. अध्यक्षांच्या समारोपानंतर अल्पोपहार होऊन समारंभ संपूर्ण झाला.

संस्थांस भेटी

सोमवारीं सकाळीं डिव्हिजनल बोर्ड ऑफ ॲग्रिकल्चरची सभा डेप्युटी डायरेक्टर, श्री. गाडगीळ, ह्यांचे अध्यक्षतेखाली भरली. तींत प्रो. काळे उपस्थित होते. त्यानंतर रत्नागिरी जिल्हा सहकारी इन्स्टिट्यूट आणि अर्बन बँक ह्या संस्थांस त्यांनीं भेटी दिल्या आणि श्री. आठल्ये आदिकरून सहकारी कार्यकर्त्यांशीं महत्त्वाच्या प्रश्नांची चर्चा केली. दुपारीं ॲग्रिकल्चरल फार्मला प्रो. काळे ह्यांनीं भेट देऊन फळांच्या लागवडीच्या सुधारणेबाबत तेथें चाललेल्या प्रयोगांचें निरीक्षण केलें आणि त्या संबंधांत समाधान व्यक्त केलें.

ना. दा. ठा. कन्याशाळा, पुणें.

उन्हाळ्याच्या सुटीनंतर ही शाळा १ जून, १९३८ पासून नेहेमीप्रमाणें ११ वाजतां सुरू होईल. शाळेंत येऊं इच्छिणाऱ्या विद्यार्थिनींची नांवनोंदणी ता. २५ मे पासून सकाळीं ८॥ ते १० पर्यंत करण्यांत येईल.

वारुबाई शेवडे, मुख्याध्यापिका.

वेस्टर्न इंडिया

लाईफ इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा

महाराष्ट्राच्या या सर्वश्रेष्ठ विमा कंपनीच्या मुंबईतील इमारतीच्या उद्घाटनप्रसंगीं देशांतील कितीएक वर्तमानपत्रांनीं मोठमोठे खास अंक काढले, राजेमहाराजे आणि मोठमोठे पुढारी यांनीं साऱ्या देशांतून ठिकठिकाणाहून शुभ संदेश पाठविले. आणि सर होमी मेथा, शेठ गोवर्धनदास मुरारजी व

श्रीमान् शेठ

घनश्यामदास बिर्ला

अशा यशस्वी व्यापाऱ्यांनीं तिचा गौरव केला.

अत्यंत सुदृढ पायावर उभारलेल्या या यशस्वी विमा कंपनीचा रौप्य महोत्सव चालू साल अखेर होत आहे. त्या वेळच्या आनंदांत भागीदार होण्यासाठीं आजच आपण वेस्टर्न इंडियांत विमा उतरा.

एजंटास चालू सालाकरितां विशेष सवलती

पुणें शाखा :

लक्ष्मीरोड, पुणें. मॅनेजर.

लॉर्ड रे इंडस्ट्रियल म्यूझियम, पुणें

मार्च–एप्रिल, १९३९ मध्यें औद्योगिक प्रदर्शन भरणार

राजे श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधी, औंधसंस्थानाधिपति, हे लॉर्ड रे इंडस्ट्रियल म्यूझियम, पुणें या संस्थेचे विश्वस्त झाले आहेत. त्यांची निवड ता. ३१-१२-३७ रोजीं झाली व या निवडणुकीस राजसाहेबांची संमति मिळाली आहे. तसेंच, श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित हे म्यूझियम संस्थेचे सन्माननीय चिटणीस झाले आहेत व या हुद्याचे शिवाय त्यांना ट्रस्टींचेहि अधिकार दिलेले आहेत. या नेमणुकीस पुणें शहर म्युनिसिपॅलिटीनें संमति दिलेली आहे. सन १९३९ सालीं मार्च-एप्रिल महिन्यांत औद्योगिक प्रदर्शन भरविण्याचें म्युझियम संस्थेच्या विश्वस्त मंडळानें ठरविलें आहे.

एशियन ॲशुअरन्स कं. लि., मुंबई

वरील कंपनीचे अध्यक्ष, श्री. जमनादास एम्. मेहता, हे गेल्या एप्रिलमध्यें सोलापुरास गेले होते, त्यावेळीं कंपनीचे डेक्कनचे ऑर्गनायझर, श्री. एस. जी. साठे, ह्यांनीं त्यांचे सन्मानार्थ आपल्या बंगल्यावर एक अल्पोपहाराचा समारंभ घडवून आणला. श्री. मेहता ह्यांनीं आपल्या भाषणांत आपण स्वतः साधे विमा एजंट कसे झालों ह्याची माहिती सांगितली व एशियन कंपनीची प्रगति निवेदन केली. शेवटीं श्री. साठे ह्यांनीं समारंभास उपस्थित असणारांचे आभार मानले.

चिलीम, सिगार व सिगारेट

तीस वर्षामागें, ग्रेट ब्रिटनमध्यें दोन-तृतीयांश लोक चिलमी ओढत होते; आतां सात अष्टमांश लोक सिगारेट पितात. सिगार ओढणारांची संख्या अतिशय कमी झाली असली तरी चिलमीची लोकप्रियता कायम आहे. स्त्रियांनीं धूम्रपानाचा अंगीकार केल्यापासून सिगारेट्सचा खप बेसुमार वाढला आहे. ५० वर्षांपूर्वी सिगारेट विशेष कोणास माहीतहि नव्हती.

घरीं अचूक परत येणारीं कबूतरें

कबुतरें दूर अंतरावर नेऊन सोडलीं असतां नेमकीं आपल्या घरीं परत येतात, ह्याची करमणूक करण्याचा शोक ग्रेटब्रिटनमध्यें अत्यंत लोकप्रिय आहे. लंडन, मिडलंड अँड स्कॉटिश रेलवेनें दोन हजार खास डब्यांतून वीस लक्ष कबुतरें नेण्याची व्यवस्था केली आहे. ह्या करमणूकीची व्यवस्था करणाऱ्या शंभर संस्था ग्रेट ब्रिटनमध्यें आहेत.

आडनांवें

टेलिफोन डायरेक्टरींत आणि युनिव्हर्सिटी कॅलेंडरांत एकाच आडनांवानें पानेंच्या पानें व्यापलेलीं आढळतात. उदाहरणार्थ, "मेथा" "जोशी" ह्यांसारखीं आडनांवें पहा. लंडनच्या टेलिफोन डायरेक्टरींत पांच हजार "स्मिथ" आहेत, "जोन्स"नें दहा पानें, "हॅरिस"नें सहा पानें आणि "कुक्"नें तीन पानें व्यापिलीं आहेत.

दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

अधिकृत भांडवल १०,००,००० विक्रीस काढलेलें भांडवल ५,००,०००

खपलेलें भांडवल २,३२,००० वसूल झालेलें भांडवल १,१५,७८०

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात. सेव्हिंग्ज खात्यावर चेक्स काढतां येतात. या बँकेवरील चेक मुंबईला सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि. मार्फत कमिशनशिवाय वसूल केले जातात. बँकेचे नियम, व्याजाचे दर व शेअरबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

M. V. GOKHALE,
मॅनेजर.

काकाकुवा मॅन्शन, लक्ष्मीरोड, पुणें २.

THE HOUSE OF MODERN STYLE SUITS.

THE DECCAN TAILORING FIRM, *DECCAN GYMKHANA, POONA 4.*

TAILORS & CLOTH MERCHANTS

—*A FRESH STOCK OF NEW DESIGNS*—

WOOLEN, COTTEN AND SILK SUITINGS, SHIRTINGS AND TROUSER FLANELS.

LONDON TRAINED CUTTER.

MANAGER—M. N. PATASKAR,
F. C. D. (London).

धी बँक ऑफ इंडिया लि.

[स्थापना— ७ सप्टेंबर १९०६]

भागलेलें भांडवल ... ... रु. २,००,००,०००
वसूल झालेलें भांडवल ... ... रु. १,००,००,०००
रिझर्व्ह फंड ... ... रु. १,०५,५०,०००

मुख्य कचेरी—ओरिएन्टल बिल्डिंग्ज, मुंबई

शाखा—बुलियन एक्सचेंज (शेख मेमन स्ट्रीट, मुंबई), बांद्रें (मुंबईनजीक), मलबार हिल (मुंबई), कुलाबा (मुंबई), काळबादेवी (मुंबई), अहमदाबाद, अहमदाबाद–स्टेशन शाखा, कलकत्ता, कलकत्ता–बडाबझार, पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, नागपूर सिटी.

लंडन एजन्ट्स—धी वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

चालू ठेवींवरील व्याजाचा दर

जानेवारी ते डिसेंबर अखेर दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या चालू ठेवींवर शेंकडा ½ टक्का व्याज दिलें जाईल, परंतु एक लाखावरील रकमेच्या चालू ठेवींवर स्पेशल व्याजाची आकारणी केली जाईल. सहामाही अखेर व्याजाची रक्कम ५ रु. इतकी असल्याशिवाय व्याज दिलें जाणार नाहीं. कायम, थोडक्या मुदतीच्या व सेव्हिंग बँकेकडील ठेवी मुद्दाम आम्ही ठेवून घेतों; व त्यांवर व्याजाची योग्य आकारणी करतों; विशेष माहिती व नियम वगैरे अर्जानें मागवावेत.

शिवाय ट्रस्टी या नात्यानें इतर जीं कामें करावयाचीं तीं करावीं लागल्यास तींसुद्धां ही बँक करते. नियमांची माहिती अर्जानें मागवावी शिवाय, सर्व प्रकारचे बँकेचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.

एजंट — टी. आर. लालवाणी.

आपण विचार केला आहे का ?–

श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी ता. १।७।३८ च्या 'केसरी'त लिहितात. " ......सर्वसाधारण बाँड योजनांच्या विरुद्ध मी तो लेख लिहिला असें नाहीं. बाँड योजना हा विम्याच्या अनेक प्रकारांपैकीं एक प्रकार आहे व प्रत्येक योजनेचा विचार जिच्या तिच्या गुणावरून केला पाहिजे..." सही ग. स. मराठे

कल्पतरु बॉण्ड

इतका लोकप्रिय होण्याचें कारण—ती योजना बहुजनांत पटली आहे. अजून हि फक्त १३॥ रु. भरून 'कल्पतरु बाँड' घेतल्यास येत्या बक्षीस वांटणींत बक्षीस मिळण्याची संधि साधतां येईल. अधिक माहितीकरितां स्थानिक प्रतिनिधीस भेटा, किंवा खालील पत्त्यावर लिहा :

टी. आर. अभंग से. ऑ. सातारा सिटी } **महाराष्ट्र अिन्शुअरन्स कं. लि., कऱ्हाड (जि. सातारा)**

प्रत्येक मोठ्या स्टँडवर बाँड विक्रीकरितां एजंटस् नेमावयाचे आहेत. त्याचे अर्ज वरील मुदतींत स्पेशल ऑर्गनायझर, चीफ अगर स्पेशल एजंटस् अगर हेड ऑफिसकडे यावेत.

स्पेशल एजंटस्:–मे. केळकर ब्रदर्स, बुधवार चौक, पुणें.
,, श्री. डी. आर. कुलकर्णी, ८८९ भांबुर्डा, पुणें ४.

चीफ एजंट:—श्री. आर. के. वाळवेकर, नगर.

स्वतःचें मुलांना योग्य तऱ्हेनें शिक्षण देऊन
त्यांचे आयुष्यांतील पुढील मार्गाची योग्य रीतीनें कालक्रमणा करण्याची तरतूद करून ठेवणें हें प्रत्येक विचारवंत मातापितरांचें आद्य कर्तव्य होय. वरील प्रकारची सोय, उत्तम रीतीनें, फक्त " आयुर्विम्या "चे योगेंच साधतां येते.

कॉमनवेल्थ विमा कंपनी
लिमिटेड, पुणें.

ह्या सर्वश्रेष्ठ विमा संस्थेनें मुलांच्या शिक्षणाचे सोयीकरतां नवीन तऱ्हेचीं विद्यार्जनाचीं कोष्टकें सुरू केलीं आहेत

ह्या बाबतींतील विशेष माहितीकरतां खालील पत्त्यावर लिहा.

रा. न. अभ्यंकर
बी. ए. एलएल. बी.
मॅनेजिंग एजंट.

स्त्रियांचा आजार

म्हणजे मुख्यतः विटाळदोष आणि गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध **आर्डोमिक्स** (आर्तवदोषारि) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे पाठावरून तयार केलेलें असून ५० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व गुप्त रोगांवर अत्यंत गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटीपोटांत कळा मारणें, अकालीं गर्भपात, ज्वर, कडकी, डोकें दुखणें, शौचास साफ न होणें इत्यादि विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या **आर्डोमिक्स**मध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत. गुणांमध्यें याची बरोबरी बाजारांतील इतर औषधें करूं शकत नाहींत. किंमत, बाटलीस रु. ३. टा. ख. १२ आणे निराळा. एकदम तीन बाटल्या मागविल्यास टपालखर्चासह ९ रु.

हिंदुस्थान, ब्रह्मदेश, व सिलोनसाठी मुख्य विक्रेते:—

धी इंडो फॉरिन एजन्सीज. (डिपार्टमेंट नं. ६)

२५३/३ माधव विलास टिळकवाडी पुणें २.

The Home for
Reliable STENO-TYPIST & ACCOUNTANTS
MARATHI KENDRA : 292 Sadashio Peth POONA

निवडक बाजारभाव

बँक रेट (२८ नोव्हेंबर, १९३५ पासून) ... ३%

सरकारी कर्जरोखे

५% करमाफ लोन (१९४५-५५)	११७-१५
५% (१९३९-४४) लोन	१०३—८
४% १९४३	१०८—४
३½% बिनमुदत	९८-१०
३½% १९४७-५०	१०६—२
२¾% १९४८-५२	१००—३

निमसरकारी रोखे

४% पोर्ट ट्रस्ट (बिगर गॅरंटी व लांब मुदत) ...	११०—८
४% मुंबई म्युनिसिपल (लांब मुदत)	१०९—८
४% मुंबई सिटी इंप्रुव्हमेंट ट्रस्ट बॉंड (७० वर्षे मुदत)	१०९—८
४% म्हैसूर कर्ज (१९५३-६३)	११२—८
५% म्हैसूर कर्ज (१९५५)	१२५—८

मंडळ्यांचे भाग

(कंसातील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

बँका

बँक ऑफ इंडिया (१००—५०) ११%	१४१—८
बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०%	११४-१२
सेंट्रल बँक ऑफ इंडिया (५०—२५) ८% ...	३२—६
इंपीरिअल बँक (५००) १२%	१५५२—८
बार्शी सें. को. बँक (५०) ५%	५८—८
रिझर्व्ह बँक (१००) ३½%	११७—८

रेल्वेज

दौंड-बारामती (१००) ४½%	१०२—०
पाचोरा-जामनेर (१००) ४½%	९६—४
अहमदाबाद प्रांतज (५००) १२½%	९४६—४
तापी व्हॅली (५००) ७½%	७२७—८

दि गुड-वुइल
ॲशुअरन्स कंपनी लि.
पोस्ट : मिरज मिशन हॉस्पिटल

विमेदारास

भरपूर सवलती — माफक हप्ते

ठिकठिकाणीं एजंटस नेमणें आहेत.

पत्रव्यवहार करावा.

हेड ऑफिस : कुपवाड, जि. सातारा,

मॅनेजिंग डायरेक्टर

६ टक्के मासिक आंवक ठेव

डॉन ऑफ इंडियाच्या वरील योजनेप्रमाणें तारीख १-१०-३८चे आंत ठेव ठेवून फायदा मिळवा.

जनरल म्यानेजर-डॉन ऑफ इंडिया ला. इ. कं. लि. पुणें.

बार्शी सेंट्रल को ऑपरेटिव्ह बँक लि.

(स्थापना १९०६)

शेअरचें वसूल झालेलें भांडवल	७९,५७०
रिझर्व्ह फंड	४५,४०५

ह्या बँकेमध्यें सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारण्यांत येत असून, सध्यां अंमलांत असलेले व्याजाचे दर पुढें दिल्याप्रमाणें आहेत:—

(१) चालू ठेवी	द. सा. द. शे.	१
(२) सेव्हिंग बँक ठेवी	,, ,, ,,	२
(३) कायम ठेव मुदत १ वर्ष	,, ,, ,,	२½
,, ,, ,, २ ,,	,, ,, ,,	३
,, ,, ,, ३ ,,	,, ,, ,,	३½
,, ,, ,, ५ ,,	,, ,, ,,	४

अधिक माहितीकरितां समक्ष अथवा पत्रद्वारें चौकशी करावी.

बार्शी, ५-५-३८. — र. प. पटवर्धन, मॅनेजर.

दि प्रॉव्हिन्शिअल बँक
ऑफ अिण्डिया लिमिटेड

स्थापना १९३६

मुख्य कार्यालय : २२/अ, हॉस्पिटल रोड, (सी. ॲण्ड. अेम्. स्टेशन) बंगलूर

शाखा : मुम्बअी, काळबादेवी, दादर, पुणें, पुणें-शहर, नाशिक, पांचगणी, सातारा, कऱ्हाड, सोलापूर, सुरत.

अध्यक्ष : खानसाहेब हाजी अहमद कासम, अेम. अेल. सी.

मॅ. डिरेक्टर : अेस्. पी. ठाकर.

करण्ट डिपॉझिट अकाउण्टस् : १०० रु. किंवा त्याहून अधिक रकमांनीं चालू होतात आणि दैनिक शिलकेवर दरसाल दरशेंकडा २ टक्के व्याज दिलें जातें.

सेव्हिंग्ज डिपॉझिट अकाउण्टस् : ५ रुपये आणि त्याहून अधिक रकमानिशीं चालू होतात आणि मासिक किमान शिलकेवर दरसाल दरशेंकडा ३ टक्के व्याज दिलें जातें. २०० रुपयापर्यंत कितीहि वेळा पैसे काढतां येतात. हा व्यवहार चेकनें करतां येतो.

कायम मुदतीच्या ठेवी : दीर्घकालीन आणि अल्पकालीन मुदतीच्या ठेवी सोयीस्कर अटीवर स्वीकारण्यांत येतात. ह्यासंबंधींची माहिती कार्यालयाकडून घ्यावी.

अनुमती मिळालेल्या कर्जरोख्यावर हातउसन्या रकमा मिळतात.

सर्व प्रकारचें बँकिंगचें कामकाज केलें जातें.

अधिक माहिती मागवावी.

एम्. मोहन, एजंट, १७ मेनस्ट्रीट पुणें. — एच. जी. गद्रे, एजंट, लक्ष्मीरोड, पुणें. २

हेच दिवस गोवें बघण्याचे !

महाराष्ट्रांतील एका अत्यंत रमणीय प्रदेशांत सहल करण्यास चला.

हिंदुस्थानभर पसरलेले कर्तृत्ववान् दक्षिणी सारस्वत त्यांची ही धर्मभूमि. त्यांचे पूर्वज इथले. त्यांच्या वसाहतीची, कलाविकासाची चिरंजीव साक्ष म्हणजे येथील देव व देवळें. रम्य वनश्री' उंच गोपुरें, विस्तृत अग्रशाळा, तलाव इत्यादि वैशिष्ट्यानें अत्यंत प्रेक्षणीय वाटणारीं हीं देवळें अनेक आहेत. मंगेशींचा श्रीमांगिरीश, कवळेंची शांतादुर्गा, रामनाथींचा रामनाथ, नागेशींचा नागेश, बांदिवड्याची महालक्ष्मी, म्हारडोळची म्हाळसा, ह्या देव-देवता, त्यांचीं देवळें व त्यांच्या आसमंतांतील सृष्टिसौंदर्य नितांत रमणीय आहे.



श्रीमांगिरीश मंगेश

गोमांतकांत रोमनकॅथॉलिक सांप्रदायी लोकांचीं देवळेंसुद्धां हिंदूंच्या देवळांइतकींच सुंदर व भव्य आहेत. त्यांतल्या त्यांत जुने गोयचीं ख्रिस्ती देवळें—जिथें सेंट फ्रॅन्सिसचें शव आज शेंकडों वर्षें राखून ठेवलें आहे——तीं देवळें फारच दर्शनीय आहेत प्रत्येकानें तीं पहावींच.



श्रीशांतादुर्गा, कवळें

गोव्यांतील आरोग्यदायी ठिकाणांमध्यें **कळंगुट** हा गांव फार प्रख्यात आहे. या दिवसांत कळंगुटच्या विस्तीर्ण समुद्रकांठीं लांबलांबचे लोक समुद्रस्नान व हवा फेर करण्यासाठीं येत असून ते तेथें महिनामहिना राहतहि असतात. पणजीपासून अवघ्या दहा मैलांवर हें गांव असून स्टीमलॉंचीस व मोटारमधून तिथें एक तासाच्या आंत पोंचतां येतें.

गोवें पहाण्यास हेच दिवस सोयीचे. या वेळीं गोव्यांत विपुल फळफळावळ-गोव्यांतील प्रख्यात आंबे, फणस, काजू यांची समृद्धि आहे. गोव्याच्या अंतर्भागांत जाण्यासाठीं वहातुकीची सोय सुलभ, बिनत्रासाची व नियमित आहे.

श्रीम्हाळसा, म्हारडोळ

बी. एस. एन. च्या बोटींनीं गोव्याला चला. सुखसोयी, वेग व व्यवस्था या बाबतींत बी. एस. एन. च्या बोटी सर्वांत पुढें आहेत. दररोज सकाळीं ९-३० वाजतां आठवड्यांतील सातही दिवस त्या गोव्याला जाण्यासाठीं सुटत असतात.

बी. एस. एन. कंपनी लि.

अप-टु-डेट शिलाई करतां
माहिंद्रकर ब्रदर्स यांचेकडे चौकशी करा
बुधवार चौक, पुणें — १२ तासांत कपडे शिवून मिळतील. — [खादी भांडाराचे माडीवर

पूना
गेस्ट हाउस
पुण्यांत येणाऱ्या प्रवाशांसाठी भोजनाचें व उतरण्याचें निर्धास्त ठिकाण.
टेलिफोन नं. ७७९ : लक्ष्मी रोड-गणपति चौक-पुणें.
हवेशीर जागा — सुग्रास भोजन — उत्तम आदरातिथ्य

अप—टु—डेट — पुण्यांत पहिलें उच्च दर्जाचें — अप—टु—डेट
हेअर कटिंग सलून
येथें आधुनिक इलेक्ट्रिक मशीनच्या सहायानें केस कापले जातात. इलेक्ट्रिक हेअर ब्रश व मसाज ह्यांची व्यवस्था. स्वच्छता व टापटीप हें आमचें वैशिष्ट्य. तज्ञ माणसाकडून विजेच्या सहायानें काम सुबक व स्वच्छ होतें.
पत्ताः—प्रो. डी. एम. आढाव, पी. डी. ब्रदर्स बिल्डिंग, टांगा स्टँड शेजारी, डेक्कन जिमखाना.

S. B. JOSHI & Co.
ENGINEERS & CONTRACTORS
41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.

पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,
रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी.
एरोपाक मिलिंग, खडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना.
भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६१५ सदाशिव पेठ.

द. कृ. सांडू ब्रदर्स चेंबूर-मुंबई
यांचे
ओरिजिनल
ब्राह्मीतेल
मेंदूचे विकार — व — डोकें दुखणें पावर
बालंतकाढा
मुलांकरितां बाळकडू.
कुमारी आसव
नं. १ दहा दिवसांत घेणेचा.
नं. २ दहा दिवसांनंतर घेणेचा.
मुख्य दुकानः ठाकुरद्वार, शाखाः परळ व दादर.
पुणें एजंटः—ठाकूर देसाई आणि कं., बुधवार, पेठ, पुणें
अनुभविक पदवीधर वैद्याकडून मोफत तपासण्याची व्यवस्था.
सकाळीं ८ ते ९. सायंकाळीं ४॥ ते ५॥.

SAHYADRI INS. Co
NASIK
BEST TO CHOOSE & TO REPRESENT
WANTED WORKERS OF EITHER SEX.
Particulars by post or in person.

भारतीय अर्थशास्त्र
लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ५५०; किंमत पांच रुपये
प्रथमतः अर्थशास्त्राच्या सामान्य तत्त्वांचें विवेचन करून पुढें हिंदुस्थानाच्या सांपत्तिक व औद्योगिक परिस्थितीचा ह्या ग्रंथांत विस्तरशः विचार केलेला आहे. हिन्दी संस्कृति, राष्ट्रीय अर्थशास्त्र, शेतकीचा धंदा, मजुरांची चळवळ, हुंडणावळ, सहकारी चळवळ, संरक्षक धोरण, करपद्धति वगैरे सर्व महत्त्वाच्या प्रश्नांचें सांगोपांग विवेचन केलेलें वाचकांस आढळेल.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.